प्रकल्प बाधित व्यक्तींना सेवा भरतीसाठी मिळणाऱ्या सवलती परिणामकारकपणे लागू करण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्यासाठी समितीची स्थापना:-

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८८/२२/सीआर-१/१६[अ]
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक : दिनांक ३ एप्रिल १९८९

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एईएम -१०८०/३५/१६[अ] दिनांक २१.१.८०

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एईएम-१०८८/२२/सीआर-१/१६[अ] दिनांक ७.१.८९

शासन निर्णय

प्रकल्प बाधित व्यक्तींना नोकरीमध्ये देण्यात येत असलेले प्राधान्य आदि सवलतींचा आढावा घेण्यासाठी व प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्यामध्ये स्थायी स्वरूपात भरण्यात येणाऱ्या पदासाठीच नव्हे तर प्रकल्प उभारणीचे काम चालू असताना ठेकेदाराकडून जी नोकर भरती करण्यात येते अशा भरती मध्ये देखील प्रकल्प बाधित व्यक्ती अथवा त्यांच्या कुटुंबियांना [illegible] सर्वोच्च प्राधान्य मिळावे हा उद्देश परिणामकारकपणे साध्य होण्याच्या दृष्टीने योग्य त्या शिफारशी करण्यासाठी एक सचिव समितीची नियुक्ती समक्रमांकाच्या दिनांक ७.१.१९८९ च्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे. त्या निर्णयात सचिव [मदत कार्य] यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याची तरतूद आहे. त्या तरतुदीत अंशत: बदल करून आता अशी दुरुस्ती करण्यात येते की, सचिव [मदतकार्य] यांची नियुक्ती "सदस्य सचिव" ऐवजी "सदस्य" म्हणून राहील व "समितीचे सचिव" म्हणून उप सचिव [पुनर्वसन] महसूल व वन विभाग हे काम पहातील..

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,

मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
सचिव समितीचे अध्यक्ष/सदस्य/सचिव
उप संचालक, (पुनर्वसन) महसूल व वन विभाग
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
महसूल व वन विभाग
इतर सर्व मंत्रालयीन विभाग.